# निशांत

भाग - ४

# जीवनोपयोगी ज्ञान

# *निशांत - भाग ४*

ऑगस्ट १९९९

संपादक / प्रकाशक

महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ

नाशिक- ४२२ ००२

लेखन व संकलन सहभाग

सखाराम गावित अर्जून दारोळे

पोपट बोर्डे यादव माघाडे

लुकस दिवे ब्रायनभाऊ

कला सजावट: गॉडफ्री डिलीमा

कम्पुटर मुद्रण: लुकस दिवे

(खाजगी वितरणासाठी)

# नि शां त

भाग - ४

# आमचे मनोगत

" निशांत " ची ही पहिली मालीका गावातल्या तळा गळातील युवक - युवतींसाठी लिहिली जात आहे. प्रत्येक गावामध्ये अशा व्यक्ति आहेत की ज्यांना सामाजीक कारणास्तव औपचारिक शिक्षणातून बाहेर पडावं लागतं किंवां बाहेर ढकललं जातं. परंतु ह्यांपैकी अनेक जन आशा बाळगतात की स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी जीवन जगावं. ह्यां इच्छूक व्यक्तिनां "निशांत" आम्ही समर्पीत करतो.

जीवन उपयोगी ज्ञान स्वावलंबनाच्या वाटेवर पहिली पायरी आहे. असे ज्ञान आपल्या भागातल्या सोप्या व प्रचलित भाषेत सादर करण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. ही मालिका वापरणाच्या प्रत्येक व्यक्तिची ज्ञानचिकित्सा उफाळून यावी जेणेकरून आणखी ज्ञान प्राप्त करण्यास त्यांचे धाडस वाढावे व स्वतःचे भविष्य आपल्याच हाताने घडवता यावे, हीच आमची मनिषा.

ज्ञानाचा शोध घेण्यास आम्हाला ही अनमोल संधी लाभली म्हणून आपले चिकित्सक बंधु-भगिनींना शतशः धन्यवाद. तसेच ह्या पुस्तकांचा मालिकेच्या उगम काळापासून म. प्र. से. मंडळाचे संचालक, ब्रायनभाऊ, ह्यांचा पाठींबा व मार्गदर्शन लाभले, तसेच म. प्र. से. मंडळाचे अनेक विस्तार अधिकाऱ्यांचे सहाय्य व सहकार्य लाभले. नाहीतर हे स्वप्न अधुरे राहीले असते, यात तीळ मात्र शंका नाही; या सर्वांना मनापासून धन्यवाद !

संपादक मंडळ

# अनुक्रमणिका

**गद्य विभागः**


१. आपलं गाव १
२. व्यसनमुक्ती ५
३. घड्याळ ८
४. दसरा १२
५. मुलगी झाली १५
६. माती परिक्षण २०
७. करंज २४
८. राष्ट्रध्वज २७
९. नेतृत्व ३०
१०. जामिनावर कसे सोडवावे ३२


**पद्य विभाग**


१. शिक्षण घेशिल का ? ३६
२. गुटखा ३७
३. व्यसनाची बेडी ३८
४. शाळा शिकायची ३९
५. एकीने बहरू ४०

धडा १ ला

# आपलं गांव

गावित एस.बी.

नाशिक जिल्ह्यातील सुरगाण्याच्या पश्चिमेला ११ कि.मी. अंतरावरील आंबाठा, हे आदिवासी गांव. गावाला चार पाडे आहेत व काही गांवं मिळून ग्रुप ग्रामपंचायत पध्दत येथे प्रचलीत आहे. पूर्वेला सतखांब, उत्तरेला आमझर, उत्तर-पश्चिमेला डोलारा व सारणेआवन, पश्चिमेला कोठूळा दक्षिण पूर्वेला भोरमाळ ही गावं वसली आहेत. तान नदी सतखांब व भवनदगड या गावा जवळून उगम पावते आणि आंबाठा गावाला वळसा घालून पश्चिमेला वाहत जाते. उंच डोंगर व दाट झाडी यामुळे गावाच्या परिसरात भरपूर पाऊस पडतो.



गाव पूर्ण आदिवासी असून त्यात ५१० पुरूष व ४८२ महिला राहतात, एकूण लोकसंख्या ९९२ आहे. त्यात महादेव कोळी, वारली, कुणबी या समाजाचे लोक राहतात. या गावातील मुख्य व्यवसाय शेती व शेतमजुरी आहे. गावात शिक्षणाचे प्रमाण कमी होते पण आता वाढत आहे. गावात जिल्हा परिषदेतर्फे १ - ७ वी पर्यंत प्राथमिक शाळा आहे. प्रबोधन विद्यालयाने १० वी पर्यंत शिक्षणाची सोय केली आहे. प्राथमिक व हायस्कूल मधील मुला-मुलींसाठी बोर्डींग सुध्दा आहे. येथील जमीन तांबडी व हलक्या प्रतीची असून उताराची आहे.




येथे भात, नागली, वरई, खुरसणी ही मुख्य पिके घेतली जातात. येथील लोकांचे राहणीमान साधे आहे. पुरुष हाफ पॅन्ट, सदरा व टोपी घालतात तर महिला लुगड व फडकी वापरतात.

गावात थंडी-ताप, हगवण, वांत्या, खरूज हे आजार प्रामुख्याने आढळतात. गावात सरकारी नर्स आहे व प्राथमिक आरोग्य केंद्र उंबरठाण व सुरगाण्याला असून, मुख्य बाजार पेठ सुरगाणा व उंबरठाण येथे आहे.

गावकरी सामुदायीक विहिरीवरून पिण्याचे पाणी घेतात. विहीर पाझर तलावा खाली आहे. सहसा पिण्यासाठी पाण्याची टंचाई नसते. आजू-बाजूने डोंगर व निसर्ग सौंदर्याने नटलेलं असं हे आपलं गाव.



चर्चेसाठी विषय:

१) आपल्या गावात पोस्ट आहे का?

२) आपल्या गावात विज आहे का?

३) आपल्या गावात कोणत्या सुधारणा झाल्या? व्हायला पाहिजेत?

४) आपल्या गावात बंधारा, पाझर तलाव, नदी आहे का?

अक्षर ओळखः

| आ | प | ल | ग | व |
|---|---|---|---|---|

लेखन सरावः

एकीची धरू आस

गावाचा करू विकास

धडा २ रा

# व्यसनमुक्ती

गावीत एस.बी.

आनंदवाडी हे एक छोटंसं गाव. गावात ३०-३५ कुटूंब. शेतमजुरी करणे हा मुख्य व्यवसाय. दिवसभर कष्ट करून पोपट आपल्या घरी आला. येतांनाच तो दारू पिऊन आला. दोन मुली व एक मुलगा असा त्याचा छोटा परिवार. जमिनीचे वाटप होऊन त्याच्या वाट्याला थोडी जमीन आली. त्यात जेम-तेम कुटुंबाचे भागत असे. तो रोजच पिऊन येई व घरात भांडण मारहाण करीत असे. त्यामुळे शेजाऱ्यांना सुध्दा त्रास होई . पोलीस पाटलाने सुध्दा एकदा दोनदा त्याला दटावले मात्र त्याचा काहीच ऊपयोग झाला नाही . दिवसेंदिवस त्याचे दारु पिण्याचे प्रमाण वाढतच गेले . कुटूंबाची ऊपासमार होऊ लागली . जमिन बटाईने दिली .

एक दिवस शिवाचे मामा त्यांना भेटायलो आले . बहीणीची खालावलेली परिस्थिती पाहून त्यांना वाईट वाटले . तो बहीनीला म्हणाला आक्का , भाड्यातोड्याची सोय मी करतो आणि दाजीला घेऊन बुलढण्याला शेषराव महाराजांकडे जातो . त्यांच्या आशीर्वादाने बरेच लोक व्यसनमुक्त झाले आहेत .

ठरल्याप्रमाणे ते बुलढाण्याला जाऊन आले . पोपटने दारू सोडण्याचा संकल्प केला . आता दोघेही बापलेक झटून काम करु लागले . वर्षभरात बटाईची जमिन सोडवली . शेषराव महाराजांचा आशीर्वाद , मनावर ताबा,केलेला संकल्प पाळण्याचा दृढ निश्चय ,व स्वतःचे कष्ट याचे फळ त्यांना मिळाले.



गावात पोपटने दारू सोडल्याची बातमी कळाली . गावातील बरेच पिणारे लोक दारू सोडण्याचा संकल्प करण्यासाठी बुलढाण्याला गेले. जे पिणारे लोक गेले नाही त्यांना गावातील वरीष्ठ लोकांनी जबरदस्तीने महाराजांकडे पाठवले . संपूर्ण गाव आता व्यसनमुक्त झाले . आनंदवाडीत आता सर्वत्र आनंद पसरला . लोक झटून कामाला लागले . आता गावाचा विकास कोण रोखणार ?

या पाठात आपण जोड अक्षर शिकू या . जोड अक्षर म्हणजे दोन किंवा तीन अक्षरे एकत्र येणे .

व + य = व्य

क + ती त्ती

चर्चाः

१. दारू पिल्याने वाईट प्रसंग गावात घडले का ?

२. दारू पिणे चांगले की वाईट ?

३. दारू सोडण्यासाठी आपण कोणते उपाय करायला पाहिजे ?

४. व्यसनं करणे किंवा अंमल करणे चांगले की वाईट?




धडा ३ रा

# घड्याळ

दिवे एल. बी.

सकाळी सूर्य पूर्वेला ऊगवतो व संध्याकाळी पश्चिमेला मावळतो. दिवस ऊगवतो तेंव्हा रात्र संपते . सोमवार ते रविवार मग पुन्हा सोमवार . ऊन्हाळा संपतो व पावसाळा सुरु होतो पावसाळ्यानंतर हिवाळा सुरु होतो.

असे हे काळाचे चक्र सतत फिरत असते .त्याच प्रमाणे घड्याळ्याचे सुध्दा चक्र फिरत असते . घड्याळाचे चित्र पहा. त्याला ऊन ,वारा व पाऊस लागत नाही.




त्याची टीक् टीक् नेहमी चालू असते. ते सदैव माणसाला संदेश देते की आपला वेळ व्यर्थ घालवू नका, गेलेली वेळ परत कधीही येत नाही .

वेळ म्हणजे माणसाला मिळालेली संधी आहे. माणूस नेहमी भविष्याचा किंवा भूतकाळाचा विचार करत असतो. मात्र वर्तमानकाळाचा पुरेपुर फायदा घेत नाही. प्रत्येक क्षण बहूमोलाचा समजून घड्याळासारखे सदैव कार्यकरत राहिले तर निश्चितच प्रगती होईल.

घड्याळात १ ते १२ अंक लिहीलेले आहेत.

हे १२ तास होय .

१२ तासाचा दिवस व १२ तासाची रात्र असे मिळून २४ तास म्हणजे एक पूर्ण दिवस होतो .

घड्याळात वेळ दाखवण्यासाठी तीन काटे असतात.

सेकंदकाटा , मिनीटकाटा , तासकाटा.

सेकंदकाट्याचा पूर्ण एक चक्कर म्हणजे ६० सेकंद एक मिनीट .

६० मिनीटे म्हणजे एक तास. २४ तास म्हणजे एक दिवस .

सात दिवस म्हणजे एक आठवडा . यात

सोमवार गुरूवार

मंगळवार शुक्रवार

बुधवार शनिवार

व रविवार या वारांचा समावेश होतो .



साधारणतः ३० दिवसाचा एक महीना.

१२ महीन्याचे एक वर्ष .

पण १२ गुणिले ३० म्हणजे ३६० मात्र एक वर्ष ३६५ दिवसांचे असते . म्हणून काही महिने ३० तर काही ३१ दिवसांचे असतात ते पुढील प्रमाणेः

| | | | |
|---|---|---|---|
| जानेवारी | ३१ | फेब्रुवारी | २८/२९ |
| मार्च | ३१ | एप्रील | ३० |
| मे | ३१ | जून | ३० |
| जुलै | ३१ | ऑगष्ट | ३१ |
| सप्टेंबर | ३० | ऑक्टोबर | ३१ |
| नोहेबर | ३० | डिसेंबर | ३१ |

वर्षातील सात महिने ३१ दिवसाचे असतात , चार महिने ३० दिवसांचे व फेब्रुवारी महिना २८ दिवसांचा व दर चार वर्षांनी २९ दिवसांचा असतो .

५२ आठवड्यांचे मिळून एक वर्ष होते . आपल्या देशात ऊन्हाळा , पावसाळा , हिवाळा हे तीन ऋतू प्रामुख्याने मानले जातात. पूर्व, पश्चिम, ऊत्तर, दक्षिण, ईशान्य , आग्नेय, नैऋत्य, वायव्य , साताळ व पाताळ अशा मिळून १० दिशा आहेत . नक्षत्र २७ आहेत पैकी १८ पावसाचे व ९ कोरडे आहेत . असं हे काळाचं चक्र अखंड फिरत राहते अगदी घड्याळाच्या काट्यांप्रमाणे.



धडा ४ था

# दसरा

माघाडे वाय.जे.

सोनं घ्या सोन्याशी गोड बोला आम्हाशी ' घरभर मुले जमली होती . आजीला आपट्याची पाने देऊन पाया पडत होती व आजीचा आशीर्वाद मागत होती . यमुनीजवळ आपट्याची पाने नव्हती मग आजीचा आशीर्वाद कसा घ्यायचा . ती रडू लागली . मुली तीला चिडवू लागल्या .




आजीला समजलं तसं आजीने यमुनीला जवळ घेतले व विचारले काय झालं बाळ सोनं द्यायला नाही आलीस तू ? आणि हे डोळ्यात पाणी का बरे? आजी माझ्याजवळ सोनच नाही यमुनी म्हणाली . अग पण आपट्याची पाने नाही तर आशीर्वाद का घ्यायचा नाही ? तीचे डोळे पुसत आजी म्हणाली .

आजीच्या पाया पडून यमुनी म्हणाली आजी आता मला सांगा आज आपट्याची/शिदाची पाने का वाटतात ? आणि ही तर झाडाची पाने मग याला सोनं का म्हणतात?

आजीने सर्व मुलांना जवळ बोलावले व म्हणाली बसा इथे. आजी सांगु लागली . आज दसरा सण आहे . आश्वीन शुध्द दशमीला विजया दशमी किंवा दसरा म्हणतात . नवरात्र संपल्यावर लगेच हा दिवस येतो . या दिवशी सिमोलंघन, शमी पुजन, अपराजीतापुजा(देवी) , व शस्त्र पुजा पुर्वीचे राजे करत.

गावाच्या वेशिच्या बाहेर इशान्य दिशेला सिमोलंघना-साठी जातात . जेथे शम्मी किंवा आपट्याचे वृक्ष असेल तेथे थांबून पूजा करतात . त्या झाडाच्या मुळाशी तांदुळ,सुपारी व नाणे ठेवतात . झाडाला प्रदक्षिणा घालून त्याच्या बुंध्याजवळील माती व पाने घरी आणतात . ती पाने देवाला सोनं म्हणून वाहतात तसेच मित्रांना देवून शुभेच्छा देतात . हा विजयाचा , पराक्रमाचा सण आहे . अर्जुनाने अज्ञातवासात शम्मीच्या ढोलीत ठेवलेली हत्यारे काढून विराटांच्या गाई पळविणाऱ्या कौरव सैन्यावर स्वारी केली व विजय मिळविला तो हाच दिवस .



तसेच मुलांनो प्रभू रामचंद्राने रावणावर विजय मिळवून त्याचा वध केला तो सुध्दा आजच्याच दिवशी , अशा या विजयामुळे याला विजया दशमी म्हणतात . आता बाळांनो आपल्याकडे जंगल राहीले नाही आणि जर आपणास आपट्याची (शिदाची) पाने मिळाली नाहीत तर हा सण साजरा करायचा नाही का ? थोरामोठ्यांचे आशीर्वाद घ्यायचे नाहीत का ? झाडाच्या पानांवरच सण अवलंबून आहे का ? किंवा झाडाची पाने एक आनंदाची देवाणघेवाण करण्याचे प्रतिक नाही का ? आपणसुध्दा असत्यावर व वाईटावर विजय मिळवून दसरा सण साजरा करू .



चर्चा :

१. आपल्या गावात दसरा सण साजरा करतात का? कशा प्रकारे साजरा करतात ?

२. आपट्याची पाने मुबलक मिळतात का ? पाने मिळाली नाहीतर काय करतात ?

३. या दिवशी झेंडूच्या फुलांचं काय महत्व आहे ?

धडा ५ वा.

# मुलगी झाली

दारोळे ए.डी.

फणसपाडा गावात राजू व जानू  नावाचे मित्र होते. नेहमी कुठलीही गोष्ट करायची तर संगतीनेच व एक विचाराने करायची असे ठरविले . लगीन सुध्दा एकाच विचाराने करायचे असे त्यांनी ठरविले.

राजूः ठीक आहे रे लग्न एकाच दिवशी करू पण तुझ लग्न सकाळी व माझे संध्याकाळी करू .

जानूः नाही पहिल तुझं मग माझं .

राजूः असं कस आजपर्यंत आपण सर्व गोष्टी एकाच विचाराने केल्या मग आता मागेपुढे नको . हे बघ आपण दोघेही एकाचवेळी लग्न करू .



जानूः अस कसं होईल ? जर एकाचवेळी लग्न झालं
तर मला तुझ्या लग्नात नाचता येणार नाही . व
तुला माझ्या लग्नात हजर होता येणार नाही .
नको आधी तुझं लग्न मगच माझं .

राजूः आधी तुझं मग माझं किंवा आधी माझं मग तुझं
असं भांडत राहण्यापेक्षा आपण छापाकाटा करु .

जानूः ठीक रे पण नाणे मी उडवीन .

राजूः नाही नाणे मी उडवीन .

दोघांचे लक्ष रस्त्याने चाललेल्या बबन्याकडे जाते . ते बबन्याला बोलवतात .

जानूः बबन्या हा रूपया घे व....

बबन्याः अरे वा ! मला रुपया कशाला देता ? तंबाखू
खायला ना ? अजून आठाने द्या की दिड
रूपयाला पुडी मिळती रे .

राजूः ए गप्प ये . (राजू त्याला सर्व काही सांगतो व
म्हणतो ) तुला रुपाया थोडाच दिलाय तंबाखू
खायला , तो तर छापा काटा करायला दिलाय .

बबन्याः अरे असा वाद घालीत बसण्यापेक्षा तुम्ही एकाच गावातल्या दोन बहिणी करा एकाच मांडवात , म्हणजे दोघांनाही एकमेकाच्या लग्नाला हजर राहता येईल .

बबन्याचे म्हणणे दोघांना पटते . त्याप्रमाणे दोघांचेही लग्न एकाच् घरातील दोघ्या बहिणींशी होते . लग्न सुखात पार पडते . दोघांचेही नवीन संसार सुरू होतात. काही दिवसांनी राजूला मुलगी व जानूला मुलगा होतो . त्या नंतर राजूला एकापाठोपाठ तीन मुली होतात . त्याला फार निराशा येते . त्याचे आई वडील सुध्दा घरात कुरकुर करतात . काय करावे हे त्याला सुचत नाही . त्याचे कामाधंद्यात लक्ष लागत नाही . तो बाहेर फिरायला जाणे टाळू लागला . बायकोचा रागराग करू लागला .

एक दिवस बबन्या व जानू त्याला भेटायला येतात .

बबनः काय राजू , कसंकाय चाललंय ? आजकाल दिसतच नाहीस ?

राजूः काय सांगू तीन पोरीच झाल्या . आईवडील सारखे कुरकुर करतात . वंशाला दिवा होण्यासाठी दुसरे लग्न कर , असं वारंवार म्हणतात .



जानू: अरे मुली झाल्या म्हणून काय झाल ? मुलगा किंवा मुलगी दोन्ही सारखेच . मुली सुध्दा मुलाच्या बरोबरीने कामे करतात . त्या काही कमी नाहीत.

बबन: इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान होत्या त्या सुध्दा बाईच होत्या ना ?

राजू: पण वंशाला दिवा नको का ?

जानू: राजू तू डॉक्टरचा सल्ला का घेत नाहिस.




राजूला पटते व तो बायकोला घेवून डॉक्टरकडे जातो . त्याला मनातून वाटले की डॉक्टर दोष बायकोचा आहे सांगून पुत्रप्राप्ती हवी असल्यास दुसरे लग्न कर असा सल्ला देतील अशा मोठ्या अपेक्षेने तो डॉक्टरकडे जातो व आपले गाऱ्हाणे मांडतो .

डॉक्टर सर्व ऐकून घेतात व म्हणतात - मुलगा किंवा मुलगी होणे हे आपल्या हातात नाही . ती एक नैसर्गीक प्रक्रिया आहे . त्यात स्त्रीचा काहीही दोष नसतो .

शास्त्रीय दृष्टीकोणातून पाहिले तर स्त्रीयांमध्ये क्ष बिजाणू (एक्स् क्रोमोझोमस) असतात व पुरूषांत क्ष व य बिजाणू (एक्स व वाय क्रोमोझोमस) हे दोनही बिजाणू असतात . क्ष व क्ष बिजाणू जुळले की मुलगी होते . व क्ष आणि य बिजाणू जुळले की मुलगा होतो मुलगा अथवा मुलगी होणे आपल्या हातात नाही .हा एक योगायोग आहे . त्यात पुरूषाचा किंवा स्त्रीचा काहीही दोष नसतो . आणि हे पहा जर तुम्ही दुसरं लग्न केलं व दुसऱ्या बायकोला सुध्दा मुलीच झाल्या तर? डॉक्टर मोरे पुढे सांगू लागले हे पहा राजू तुम्ही मुलगा होण्याचा हट्ट धरू नका . आज मुलगी सुध्दा मुलां प्रमाणेच कामे करते . बघ माझी बायको डॉक्टर आहे . आम्हाला दोन मुलीच आहेत व आम्ही त्यांना खुप शिकवणार आहोत . तू तुझ्या मुलींना चांगले शिकव . शिकलेली मुलगी प्रकाश देते दोन्ही घरी

चर्चाः

१. आपला मुलींकडे पाहण्याचा दृष्टीकोण कोणता ?
२. आपण मुलींना शिक्षण देतो का ?
३. घरातील सर्व कामे मुलीनाच का करावी लागतात ?

धडा ६ वा

# माती परीक्षण

माळी व्ही.एम.

भारत कृषीप्रधान देश आहे . देशातील अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतीला सुधारीत बी बीयाणे खते , किटकनाशके , पाणी इत्यादिंची आवश्यकता असते . त्या पैकी खत नियोजन हा महत्वाचा घटक आहे . शेतकरी शेतात ऐपतीप्रमाणे खत टाकतो . पण नेमके किती टाकावे याचे त्याला ज्ञान नसते . त्यामुळे बऱ्याचवेळा खत वाया जाते . जमिनीनुसार व पिकांनुसार किती खत द्यावे याची माहीती शेतकऱ्यांना असणे आवश्यक आहे . त्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने माती परिक्षण करणे गरजेचे आहे .

माती परिक्षणाचे नमुने कसे घ्यायचे :



१. मातीचा नमुना घेतांना एक हेक्टर क्षेत्रातुन साधारणतः १० ठिकाणचे नमुने घ्यावे . जेथे नमुना घ्यायचा तेथली काडी कचरा बाजुला करून कुदळीच्या सहाय्याने १ बाय १ चा खड्डा घ्या .प्रत्येक खड्ड्यातुन वर पासुन खालपर्यत माती तासुन घ्यावी . ती सर्व एकत्र करून चार भाग करावे . त्या पैकी समोरासमोरचे दोन भाग ठेवावे . असे अर्धा किलो माती शिल्लक राहील तो पर्यंत करावे . ती माती सावलीत सुकवून कापडी पिशवित बांधून ठेवावी . या नमुन्यात कळवावे . सोबत शेतकऱ्याचे नाव व पत्ता ,शेताचा गट नंबर, नमुन्याची तारीख , जमिनीचा प्रकार व मागील वर्षी कोणते पिक घेतले व त्यास कोणते खत दिले याची माहीती तसेच चालू वर्षी कोणते पिक घेणार याचा तपशील दयावा . तसेच शेती जिरायत की बागायत

ते नमुना घेतांना घ्यावयाची काळजी :

१. मातीचा नमुना घेतांना पहिल्या पिकाची कापणी झाल्यावर व दुसऱ्या पिकाच्या पेरणीआधी तसेच नांगरणी आधी नमुना द्यावा .

२. जनावरे बसण्याची जागा ,खताचे खड्डे इ ठिकाणी खड्डे घेऊ नयेत .

३. मातीचे नमुने वेगवेगळ्या खोलीतुन व वेगवेगळ्या भागातून घ्यावेत .

४. पिकासाठी खताचा वापर झाल्यास कमीतकमी ३ महीने मातीचा नमुना घेऊ नये .

५. नमुने घेतेवेळी शेणाचे तुकडे व कुजलेले शेणखत नसावे .

६. पीक ऊभे असतांना पीकांच्या दोन ओळीतील मधल्या मोकळ्या जागेतुन नमुने घेता येतात .



माती परिक्षणाचे फायदे :

१. जमिनीची सुपिकता कायम टिकवण्यासाठी व तीची ऊत्पादन क्षमता वाढवण्यासाठी मदत होते .

२. पीकांना आवशक असलेल्या अन्नद्रव्याचा समतोलपणा कायम राखता येतो .

३. जमिनीतील आम्लता , विम्लता व क्षार यांचे मुल्यमापन करून पीक वाढीस योग्य जमिन करता येते.

४. माती परिक्षणानुसार खते वापरल्यास खर्चात बचत होते व उत्पादन वाढवता येते .

मातीचे नमुने परिक्षणास कोणाकडे द्यावे :

१. प्रशिक्षण व भेट योजणेच्या अधिकाऱ्याशी संपर्क साधावा .
२. महाराष्ट्र अभियांत्रीकी संशोधन केंद्र (मेरी)
३. खत कंपन्याच्या प्रयोगशाळेत
४. शेतकी महाविदयालये

चर्चा:

१. आपण माती परिक्षण का करता ?
२. माती परिक्षण करणे गरजेचे आहे का ?
३. माती परिक्षणाचे महत्व काय ?
४. माती परिक्षणास आपण तयार होणार का ?



धडा ७ वा

# करंज

गावीत एस.बी.

खरपडी गावातील विठू रात्री मोठमोठ्यानं रडू लागला . चौकशी केली तेंव्हा तो म्हणाला माझ पोट फार दुःखतय . निम्या रात्रीत त्याला न्यायच तरी कुठे ? न्यायला साधन नाही व ११ कि.मी. दूर दवाखाना .



काय करायचं ? गावातील एकनाथ डवऱ्या जाणकार आहे, त्यालाच बोलवा . एकनाथ डवऱ्याला घेऊन एक जण आला . डवऱ्याने त्याला तपासले . दोघे जण सोबतीला घेऊन एकनाथ गावाच्या नाल्या शेजारी गेला. परत आल्यावर त्याने सोबत आणलेल्या औषधाने विठूचे पोट शेकले . विठूला आराम पडला . जमलेल्या लोकांनी एकनाथला आग्रहाने विचारले की, तुम्ही कोणते औषध वापरले ? त्यावर तो म्हणाला , " तुम्ही

मला रात्रीबेरात्री औषधाकरीता ऊठवता , पण आता माझे वय झाले मला जमत नाही तरीही यावे लागते . तुम्हालाच जर मी कोणते औषध वापरतो हे समजले तर आपण हे उपाय घरीच करू शकता म्हणून तुम्हाला मी सांगूनच टाकतो . "विठूला आता मी जे औषध दिले ते म्हणजे करंजाच्या झाडाची साल . करंजाची साल गरम करून त्याचे पोट शेकले . आराम पडला बस !"

'पण या व्यतीरिक्त या झाडाचे अजूनही काही औषधी उपयोग आहेत . ते सुध्दा मी तुम्हाला सांगूनच ठेवतो ."

१. पिसाळलेलं कुत्र चावंल तर :
   त्या व्यक्तीला १ कप रोज मुळ व साल कुटून पाण्याबरोबर वस्त्रगाळ करून तीन दिवस एक एक कप पाजावे .

२. कातडीच्या रोगावरः
   खरूज , गजकर्ण , दाद , इसब , नायटा, पुरळ , बेंड , व इतर कातडीच्या रोगावर करंजाचे तेल लावणे . करंजाच्या बियांना बाजारात चांगली किंमत मिळते.

३. चाराः करंजाची पाने गुरांना चारा म्हणून वापरतात , तसेच जमिनीत गाडून खतही करतात .

४. करंजाच्या ढेपीच्या खतामुळे शेतातील वाळवी व इतर किडींचा बंदोबस्त होतो .



चर्चाः

आपल्या गावात आजारी पडल्यावर कोणते उपाय करतात ?

आपल्या गावात करंजी व इतर औषधी वनस्पती आहेत का ?

अशा प्रकारच्या औषधी वनस्पतीची माहीती जमवा व त्याचे औषधी उपयोग सांगा .

वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे ।।


झाडे लावा , मोक्ष पावा ।।

धडा ८ वा

# राष्ट्र ध्वज


दिवे एल.बी.

राष्ट्राचे किंवा एखाद्या राज्याचे प्रमुख मानचिन्ह ऊंच दंडाच्या टोकाला पताका,कमळ किंवा चक्र अशासारखे चिन्ह लावले असता ध्वज तयार होतो ,याला मराठीत झेंडा किंवा निशाण म्हणतात . ध्वजाची पताका त्रिकोणी किंवा आयाताकार असून सुती किंवा रेशीम वस्त्राची असते .



भारतीय राष्ट्र ध्वजाची परंपरा इ.स. १९०६ पासुन सांगता येईल . स्वातंत्र्यासाठी जे क्रांतीकारक भारतीय तरूण युरोपात कार्य करीत होते त्यांना आपल्या स्वातंत्र्य ध्वजाची नितांत आवश्यकता भासू लागली . श्रीमती कामा यांनी फ्रांसमध्ये असतांना भारतीय स्वातंत्र्याचा जो एक ध्वज तयार केला त्यावर केसरी , पिवळा व हिरवा या तीनरंगाचे तीन पट्टे होते . पिवळ्या पट्टयावर वंदे मातरम् ही निळी अक्षरं , केसरी पट्टयावर आठ कमळे व

हिरव्या पट्ट्यावर चंद्र व सूर्य चित्रीत केलेले होते . जर्मनीतील बर्लीन येथे झालेल्या समाजवादी परिषदेत हा ध्वज फडकावण्यात आला . इ.स. १९३१ मध्ये राष्ट्रीय सभेने आपल्या ध्वजाला निश्चित रूप दिले . त्याची लांबी व रूंदी३′ व २′ त्यात केशरी पांढरा व हिरवा असे तीन रंग होते . पांढऱ्या पट्ट्यावर निळ्या रंगाचा चरखा काढलेला असे . त्यातील केशरी रंग धैर्य व त्याग याचे प्रतीक मानला गेला . शुभ्र रंग शांती व सत्य याचे प्रतीक व हिरवा रंग शौर्य व श्रध्दा यांचा निदर्शक ठरला . १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर वरील तिरंगा ध्वजच आपला राष्ट्रध्वज ठरला . मात्र त्यात चरख्याच्या जागी अशोकचक्र आले.



अशोकचक्र निळ्या रंगाचे असून त्याला २४ आरे आहेत. अशोकचक्र भारतीय संस्कृतीचे अर्थगर्भ प्रतीकच आहे . राष्ट्रीय ध्वज म्हणजे त्या त्या राष्ट्राच्या परंपरेचे व तेजस्वी अस्मितेचे प्रतीकच असते . त्यात साऱ्या राष्ट्राची प्रतिष्ठा एकवटलेली असते . त्यामुळे तो

राष्ट्राचा एक मानबिंदू ठरतो . आपल्या राष्ट्रध्वजा विषयी आपल्या मनात पावित्र्याची भावना असायला हवी . आपल्या हातून त्याचा सन्मान व्हायला हवा . त्याच्या रक्षणासाठी दाहक दिव्य करण्याची व प्रसंगी प्राणार्पण करण्याची प्रत्येकाची तयारी असायला हवी.

चर्चाः

आपल्या गावात झेंडावंदन होते का ?

कुठेकुठे व कोणत्या दिवशी झेंडावंदन होते ?

झेंडावंदनात लोक सहभागी होतात का ?

गावातील कोणी पोलीस व सेनादलात भरती झालेत का ?

गावात कोणी स्वातंत्र्य सैनिक आहे का ?

घोषणाः

जय हिंद ।

झेंडा ऊंचा रहे हमारा ।

वंदे मातरम् ।

माझा भारत महान ।

देशासाठी देऊ प्राण ।।



सौजन्यः मुलांचा संस्कृती कोष

धडा ९ वा

# नेतृत्व

दारोळे अ.द.

## मनोऱ्याचा खेळ:

खेळाचे साहित्य : बारा चपटे दगड अथवा ठोकळे .

नियम : गटातून दोन स्वयंसेवक बोलवा .

मनोरा बांधणाऱ्याचे डोळे बांधणे. त्याने एकाच हाताने मनोरा बांधणे दुसरा हात वापरू नये .

दुसऱ्या स्वयंसेवकाचे हात बांधणे . त्याने मनोरा बांधनाऱ्याला मार्गदर्शन करायचे . तसेच सहकाऱ्याला तोंडाने सुचना करणे . शारीरिक मदत करता कामा नये.

गटातील बाकी सभासदांनी काहीच न बोलता खेळात सहभागी व्हावे .

खेळाच्या आधीची तयारी- सर्व दगड अथवा ठोकळे मर्यादित भागात विखरून ठेवा . स्वयंसेवकांना एकमेकांच्या समोर ऊभे करा . बाकीचे सभासदांना गोल यांच्या भोवती ऊभे करा. दोन्ही स्वयंसेवकाला पूर्व सुचना द्या .

खेळाची सुरवातः डोळे बांधलेल्यास मनोरा बांधण्यास सांगा . त्याचा साथिदार त्यास तोंडी सुचना करतो . ऊदा. दगड पुढे , मागे , पूर्वेला , पश्चिमेला आहे इ.


चर्चाः

१. मनोरा तयार झाला का ? का ?

२. मनोरा तयार करतांना कोणत्या अडचणी आल्या .

३. मार्गदर्शनाची गरज आहे का ?

४. मार्गदर्शका शिवाय मनोरा तयार करता आला असता का ?



तात्पर्यः दोघांच्या सहकार्याने मनोरा तयार होतो . एकमेकांच्या सहकार्याने सामुदायीक कार्य आधिक चांगले व प्रभावी होते.

टिपः हा खेळ वर्गात घेऊन आलेल्या अनुभवाचे टिपण करा .

घोषणाः

एकमेका साह्य करू  
अवघे धरू सुपंथ ।।

## धडा १० वा जामिनावर कसे सोडवावे ?

सुळपाड्यात शेतीच्या वादावरून पोपट व पांडू यांच्यात वाद झाला . रात्री भयंकर मारामाऱ्या झाल्या . पांडूने पोलीसात फिर्याद नोंदवली . पोपटला पोलीसांनी अटक केली व पाच सहा दिवस कोठडीत ठेवले . घरच्या माणसांना या बद्दल काहीच माहीती नसल्याने ते विचारात पडले . काय करावे त्यांना समजेना ? याच वेळी मोहन तेथे आला तो सामाजिक कार्यकर्ता होता . चिंतेचे कारण विचारले असता त्याला सर्व घडलेला प्रकार समजला . कायद्याची माहिती असल्याने तो सांगू लागला गुन्हे दोन प्रकारचे असतात .

१) दखलपात्र गुन्हा
२) अदखलपात्र गुन्हा

अटक झालेल्या व्यक्तीचे हक्क:

१. अटक करण्याचे कारण विचारता येते .
२. वॉरंट पहाण्याचा हक्क आहे .
३. पसंतीचा वकील निवडता येतो .
४. वकील घेण्यास ऐपत नसेल तर सरकारी वकील घेता येतो .

५. अटक केल्यापासुन २४ तासाच्या आत आरोपीस न्यायधिशासमोर उभे करावे .

६. जामिनावर सुटता येते कि नाही याची माहिती पोलीसांनी सांगीतली पाहीजे . तसे विचारु शकतो.

७. गुन्हेगार स्वेच्छेने जायला तयार झाल्यास त्याला बेड्या घालुन नेता येत नाही किंवा बांधून नेता येत नाही.



जामीनः अटक झालेल्या माणसाला सोडवण्यासाठी हमी म्हणून मालमत्तेचे कागदपत्र, ७/१२, घराचा उतारा, पैशांच्या स्वरुपात तारण ठेवून आरोपीस सोडवता येते.

काही गुन्ह्यात पोलीस स्टेशनमध्ये जामिन ठेवून सोडविता येते . काही गुन्ह्यात न्यायधिशासमोर जावून जामीन देवून सोडविता येते . मोठा गुन्हा केल्यास न्यायधिश त्यांना लवकर जामीन देत नाही . अटक झाल्यावर पुरूष पोलीस पुरूष गुन्हेगाराची झडती घेवू शकतो मात्र त्याला महिला


गुन्हेगाराची झडती घेता येत नाही . ती महिला पोलीसानेच घ्यावी लागते . हा आपला हक्क आहे. न्यायधिशाने जामीन नाकारल्यास गुन्हेगाराला १५-१५-१५-१५ दिवसाच्या अंतराने कोठडीत ठेवण्याचा आधिकार त्याला आहे .

पोलीस स्टेशनमध्ये जामीनबद्दल माहिती मिळवून जामीन भरून जवळचे नातलग किंवा वकिला द्वारे जामिन घेवून आरोपिस घरी नेवू शकतो.

## खंत

माघाडे वाय.जे.

डोळे असुन वाचता येत नाही .
हात असुन लिहीता येत नाही .
बलवान असुन आत्मविश्र्वास नाही .
श्रीमंत असुन हिशोब जमत नाही .
बाजार करतो पण किलो समजत नाही .
प्रवास करतो पण एस.टी. समजत नाही.
मनात आहे खंत तयांची ।
वाट पहातो मुक्तीची ।।



# पद्य विभाग :

# १. शिक्षण घेशील का ?

पुंडलीक रुईपेडा

जीवन उपयोगी शिक्षण घेशील का?
सांग तू साक्षर होशील का?
वाटचाल करतांना जीवनाची
निरखून पहा हो रीत जगाची
गरज आहे तुम्हा विज्ञानाची
विचाराची सांगड घालशील कां?





व्यसनाधीन संसाराला आग लावतात
तरीहि दूसरे लोक तोच मार्ग धरतात
आश्चर्य जगातील मोठे आहे सर्वात
व्यसनमुक्त होशील का?

देव देव सगळे मारिती हाका
धर्म पंथ सांप्रदयाचा धरलाय ठेका
मानव भेदभाव कलंक लागलाय पता
सबका मालीक एकच मानशील का?



नोकरी धंदा व्यापार योजना
धडपड आहे पैसा मोठेपणा
यांच्यातील मर्म आपण जाणा
मनी प्रबोधन होईल का?

## २. गुटखा

गावीत एस.बी.


माझा राजू शाळेला जातो हो
दर वर्षाला नापास होतो ।। धृ.।।
त्याला लागलाय गुटख्याचा शोक
घरी त्याला बापाचा धाक
चोरी छुपीने गुटखा खातो हो ... ।। १.।।
रोज खर्चायला पैसे मागतो
घरादारात रागाने वागतो
टपरीवाल्याकडे उधारी करतो हो... ।। २.।।
रात दिवस गुटखा खातो
नको तिथं थुकत बसतो
घडीघडीला गुटखा खातो हो... ।। ३.।।
त्याला दमाचा आला झटका
त्याने सोडला आता गुटखा
गुटखा खावू नका सांगत फिरतो हो... ।।४.।।



## ३.　　व्यसनाची बेडी

लुकस दिवे.

आता सोड तंबाखू , दारू , बिडी
गुटखा , सिगारेट , आफू , ताडी
तोड आता तोड तरूणा व्यसनाची बेडी ।।धृ.।।
खोकुन खोकुन खंगला
तरी नशेमध्ये तु रंगला
काळजाची तुझ्या होईल चिंधडी ।।१।।
अंमलात झिंगला
उधारी करुन तु दमला
उद्योगधंदा कर , शेतीवाडी ।।२.।।
मारीत चकाट्या फिरला
पत्ते कुटीत पारावर बसला
लागु दे तुला कामाची गोडी ।।३.।।




## ४. शाळा शिकायची

राजाभाऊ माघाडे

कशाला करतेस ग आई तू घाई लग्नाची
आहे अज्ञान अजून मी , मला शाळा शिकायची ।।धृ.।।



खुप शिक्षण मी घेईल
मोठी विद्वान मी होईल
कशी स्वतःच्या पायावर
मग मीच ऊभी राहील
आई जाण तुच ठेव , माझ्या मनाची ।।१.।।



गेला तुझा जमाना गेला
विना शिक्षणाचा घालविला
दिली दवडून सारी संधी
डोळसपणा तू दडविला
आता शिक्षण घेणे आहे , गरज काळाची ।।२.।।




घरोघरी करू प्रचार
होवू डॉक्टर , इंजिनियर
वाढवू देशाची शान
कशी सुखात पडेल भर
राजाभाऊ स्वप्न पाहे
जग साक्षर होण्याची ।।३.।।


# ५. एकीने बहरू

लुकस दिवे

चला हो चला संगतीनं चला
एकीने बहरू आता चला ।।धृ.।।
अरूंद वाट अवघडं
पुढेच जाऊया विकासाकडं
मागे ना पहायचे , पुढेच जायचे
शिखर आता गाठू या ।।१.।।
रात अंधारी हो काळोखी
मशाल घ्या हाती जळती
हातात हात जाऊ या थेट
अंधार गिळून टाकण्या ।।२.।।



# शब्द कोडे




आडवे शब्द

०१. ग्रिष्मातील लाल फुलांचे झाड

०५. या पासुन लाडू बनवतात

०६. ओढ, उत्सुकता

०७. डोळ्यावर येणारा केसांचा पुंजका

०९. नवरात्री नंतरचा उत्सव

१०. गोडी, आवड

१२. दडणे, झुपणे

१३. कपडे धुण्यास वापरतात (हिंदी)

१४. सुर्य (इंग्रजी)

१६. जनावरांची मस्ती

१७. रॅशन कार्डावरील मराठी अक्षर

१९. पाणी वाहणारी मोटार

उभे शब्द

०१. फुलांचा राजा

०२. राष्ट्रीय पक्षि

०३. स्वासाद्वारे आत घेतो

०४. आधार, आश्रीतांना दिलेला...

०६. जवळपास, इथं कुठे तरी

०८. वरून हिरवं आत लाल, फळ

०९. सेनेतील शिपायाची तुकडी

११. वर्ष, साल

१३. प्रवासात सोबत घेतलेले

१५. मुलीचे नांव

१७. लाख लावून बंद केलेले

१८. फिर्याद